# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः31.05.2026** **वारः रविवार**

---

**ठळक बातम्या**

**-गरज भासल्यास ऑपरेशन सिंदूरच्या दुसऱ्या टप्प्यासाठी लष्कर सज्ज असल्याचं लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांचं प्रतिपादन**

**-शेतीमध्ये खतांचा अतिरेक रोखण्यासाठी उद्यापासून ३० जूनपर्यंत देशभरात 'खेत बचाओ अभियान'**

**-पश्चिम आशियातील संघर्षामुळं जागतिक अनिश्चितता असतानाही, भारताची आर्थिक कामगिरी भक्कम आणि स्थिर - वित्त मंत्रालयाचा अहवाल**

**-हिंदी पत्रकारितेच्या द्वीशताब्दीनिमित्त, पहिलं हिंदी वृत्तपत्र 'उदंत मार्तंड'च्या सन्मानार्थ टपाल तिकीटाचं अनावरण आणि**

**-सिंगापूर खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत, सात्विक साईराज रांकी रेड्डी आणि चिराग शेट्टी जोडी अंतिम फेरीत**

आता सविस्तर बातम्या

**एनडीए-द्विवेदी**

भारतीय सशस्त्र दलं सर्वोच्च कार्यवाहीसाठी सज्ज आहेत. परिस्थितीनुरूप लष्करी कारवाईची गरज भासली तर ऑपरेशन सिंदूरच्या दुसऱ्या टप्प्यासाठी लष्कराची सज्जता असल्याचं प्रतिपादन लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी काल केलं.
पुण्यातील एनडीए राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या दीडशेव्या तुकडीचा दीक्षांत संचलन सोहळा काल पार पडला. या तुकडीत १८ महिला कॅडेटस्सह ३५३ कॅडेटस्नी आपलं प्रशिक्षण पूर्ण केलं. या समारंभाला संबोधित करताना जनरल द्विवेदी बोलत होते. ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून भारत कोणत्याही चिथावणीला अचूक आणि दृढनिश्चयानं प्रत्युत्तर देण्यास सक्षम असल्याचं सिद्ध झालं आहे. देशासमोरील नव्या सुरक्षिततेच्या आव्हानांना कशाप्रकारे प्रतिसाद द्यावा, याचा आदर्श ऑपरेशन सिंदूरनं प्रस्थापित केल्याचं त्यांनी यावेळी नमूद केलं. उत्तीर्ण झालेल्या कॅडेट्सना व्यवसाय-कुशलता, नेतृत्वगुण आणि राष्ट्रसेवे सर्वोच्च मापदंड कायम राखण्याचं आवाहन त्यांनी केलं.

**सीडीएस**

चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ जनरल अनिल चौहान काल सेवानिवृत्त झाले. दिल्लीतील राष्ट्रीय युद्ध स्मारक इथं तिन्ही दलांकडून त्यांना मानवंदना देण्यात आली. त्यानंतर त्यांनी युद्धस्मारकावर पुष्पचक्र वाहीलं. देशाचे सर्वोच्च लष्करी अधिकारी म्हणून त्यांच्या गौरवशाली कार्यकाळाची काल सांगता झाली. तीनही दलांकडून मानवंदना स्विकारून सेवेतून निवृत्त होणं ही अभिमानाची, सन्मानाची बाब असल्याचं जनरल चौहान यांनी नमूद केलं. चार दशकांच्या प्रदीर्घ लष्करी सेवेच्या काळात त्यांना परम विशिष्ट सेवा पदक, अतिविशिष्ट सेवा पदकांसारख्या सन्मानानं गौरवण्यात आलं होतं.

**खते**

शेतीमधील खतांचा अतिरेक रोखण्यासाठी उद्यापासून 30 जूनपर्यंत देशव्यापी खेत बचाओ अभियान राबविण्यात येणार असल्याचं केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान काल नवी दिल्लीत या अभियाना'च्या तयारी संदर्भात आयोजित एका उच्चस्तरीय बैठकीत सांगितलं. खतांचा संतुलित आणि विवेकपूर्ण वापर, हवामानाशी संबंधित आव्हानांच्या

पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना वेळेवर योग्य सल्ला देणं, पंचायत स्तरावर सक्रिय सहभाग आणि विविध योजनांचे लाभ थेट गावांपर्यंत पोहोचवणं, या बाबींवर या अभियानात लक्ष केंद्रित असेल.
भारतात वार्षिक अंदाजे ६० दशलक्ष मेट्रिक टन खतं वापरली जातात. यामुळं भारत हा जागतिक स्तरावर खतांचा दुसरा सर्वात मोठा उपभोक्ता आणि तिसरा सर्वात मोठा उत्पादक देश ठरला आहे. यापैकी ५०० LMT पेक्षा अधिक खतांचं उत्पादन देशांतर्गत पातळीवर केलं जातं, आणि उर्वरित गरज आयातीद्वारे पूर्ण केली जाते. या अभियानात सहभागी होणाऱ्या सर्व संस्थांसाठी 'कृषी विज्ञान केंद्रां'ना मुख्य समन्वयक म्हणून महत्त्वाची भूमिका सोपवण्यात आली आहे. एक हजार सहाशेहून अधिक पथकं तयार करण्यात आली आहेत; तसंच, खतांचा वापर प्रमाणापेक्षा अधिक करणाऱ्या १०० जिल्ह्यांसाठी पाचशे विशेष पथकं गठित करण्यात आली आहेत.

**मकीबा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज आकाशवाणीवरुन मन की बातच्या १३४ व्या भागातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. सकाळी अकरा वाजता याचं थेट प्रसारण होईल. आकाशवाणी, दूरदर्शनच्या सर्व वाहिन्या, त्यांच्या यूट्यूब वाहिन्या, तसंच न्यूज ऑन एआरआर ॲपवरून मन की बात ऐकता येणार आहे.

हे राष्ट्रीय बातमीपत्र आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरुन देण्यात येत आहे...

**अर्थव्यवस्था**

पश्चिम आशियामध्ये सुरू असलेल्या संघर्षामुळं निर्माण झालेल्या जागतिक अनिश्चिततेचा सामना करत असतानाही, भारताची आर्थिक कामगिरी भक्कम आणि स्थिर राहिली आहे. वित्त मंत्रालयाच्या मे २०२६ च्या 'मासिक आर्थिक आढाव्या'नुसार, देशाची परकीय चलन गंगाजळी समाधानकारक पातळीवर कायम राहिली आहे.

कच्च्या तेलाच्या वाढलेल्या किंमती, कठोर होत चाललेली आर्थिक परिस्थिती आणि प्रमुख अर्थव्यवस्थांमधील मंदावलेली वाढीची गती यांमुळे जागतिक वातावरण अधिकच आव्हानात्मक बनलं असल्याचं; आणि या बाबी भारतीय अर्थव्यवस्थेसाठी प्रतिकूल ठरू शकतात असं या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

पायाभूत सुविधा आणि उत्पादन क्षेत्रातील उलाढालीनं आपली मूळ गती कायम राखली असली, तरीही या वर्षी मार्च महिन्यात 'गाभा उद्योगांच्या निर्देशांकात' ४ दशांश टक्क्यांची किरकोळ घट दिसून आली. किरकोळ महागाईच्या स्वरूपात मोजला जाणारा महागाईचा दबाव या वर्षी मार्चमध्ये ३ पूर्णांक ४ टक्क्यांच्या मर्यादित पातळीवर नियंत्रणात राहिला आहे. आर्थिक व्यवस्थेतील उपलब्ध रोखीचं प्रमाण अतिरिक्त स्वरूपात उपलब्ध असून, बँक कर्जाच्या वाढीचा वेग स्थिर राहिला आहे.

**कापूस**

सरकारनं १ जून ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीसाठी कापूस आयातीवरील सीमा शुल्क तात्पुरतं माफ केलं आहे. वस्त्रोद्योग मंत्रालयानं एका अधिसूचनेत म्हटलं आहे की, कापूस उत्पादक शेतकरी आणि संपूर्ण कापूस मूल्य साखळीचं हित अग्रस्थानी ठेवून हा निर्णय घेण्यात आला आहे. कापसाच्या हंगामाव्यतिरिक्त या काळात लागू करण्यात आलेल्या या उपाययोजनेमुळं वस्त्रोद्योगासाठी कापसाची पुरेशी उपलब्धता सुनिश्चित होईल अशी अपेक्षा आहे.

**इबोला**

जागतिक आरोग्य संघटनेचे महासंचालक टेड्रोस अधानोम गेब्रेयसस यांनी, डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ काँगो आणि युगांडामधील इबोलाच्या उद्रेकाला प्रतिसाद म्हणून प्रवासबंदी लादलेल्या किंवा सीमा बंद केलेल्या देशांना अशा उपाययोजनांवर पुनर्विचार करण्याचं आवाहन केलं आहे. यामुळं मदतकार्यात अडथळा येऊ शकतो, असं ते म्हणाले. इबोला उद्रेकाचं केंद्र असलेल्या पूर्व काँगोमधील बुनिया इथं भेट दिल्यानंतर ते बोलत होते.

काँगोमध्ये इबोलाची ९०६ संशयित प्रकरणं आणि २२३ संशयित मृत्यूंची नोंद झाली आहे, तर शेजारील युगांडानं नऊ बाधित रुग्ण आणि एका मृत्यूची पुष्टी झाली आहे. या प्रादुर्भावामध्ये इबोलाच्या बुंदीबुग्यो प्रकाराचा समावेश असून त्यावर कोणतीही मान्यताप्राप्त लस किंवा उपचार उपलब्ध नाही.

**तंबाखू**

तंबाखूच्या वापराच्या धोक्यांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी आज जागतिक तंबाखू विरोधी दिन पाळण्यात येत आहे. या वर्षीची संकल्पना 'आकर्षणाचा बुरखा फाडणे - निकोटीन आणि तंबाखूच्या व्यसनाचा सामना करणे' अशी आहे. तंबाखूच्या वापरामुळं दरवर्षी अंदाजे ८० लाख लोकांचा अकाली मृत्यू होतो, यापैकी ७० लाखांहून अधिक मृत्यू थेट तंबाखूच्या वापरामुळं आणि अतिरिक्त १३ लाख मृत्यू अप्रत्यक्ष धूम्रपानाच्या संपर्कामुळं होतात. भारतात, तंबाखूच्या व्यसनामुळं दरवर्षी अंदाजे साडेतेरा लाख मृत्यू होतात.

**हज**

सौदी अरेबियामध्ये या वर्षी आयोजित 'खितामहू मिस्क' समारंभात भारताच्या हज मिशननं दोन प्रतिष्ठित पुरस्कार पटकावले. यात्रेकरूंच्या सेवेतील उत्कृष्ट कामगिरीचा गौरव करण्यासाठी सौदीच्या हज मंत्रालयातर्फे दरवर्षी दिले जाणारे 'लब्बैतुम पुरस्कार' भारतीय हज मिशनला 'सर्वोत्कृष्ट हज समन्वय आणि संवाद' या श्रेणीअंतर्गत प्रदान करण्यात आले. यावर्षी, अंदाजे १ लाख ७५ हजार भारतीय यात्रेकरूंनी हज यात्रा पूर्ण केली. दरवर्षी सौदी अरेबियाला यात्रेकरू पाठवणाऱ्या डझनभर देशांच्या हज मिशनच्या कामगिरीतील उत्कृष्टतेचा एक निकष म्हणून 'लब्बैतुम पुरस्कारां'कडं पाहिलं जातं.

**आभा**

राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाद्वारे राबवण्यात आलेल्या 'आयुष्मान भारत डिजिटल मिशन'नं देशभरात ९० कोटी 'आयुष्मान भारत आरोग्य खाती' उघडण्याचा महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. आरोग्य मंत्रालयानं दिलेल्या माहितीनुसार, 'ABHA' खात्यांची संख्या २०२१ मधील १४ कोटींहून अधिक संख्येवरून, यावर्षी ९० कोटींपर्यंत पोहोचला आहे. १५ कोटींहून अधिक 'ABHA' खात्यांसह उत्तर प्रदेश राज्य याबाबतीत देशात अव्वल स्थानी आहे; त्यानंतर प्रत्येकी ७ कोटी खात्यांसह राजस्थान आणि महाराष्ट्र यांचा क्रमांक लागतो.

**पुणे विषारी दारू**

पुणे विषारी दारू प्रकरणातल्या मृतांची संख्या २२ वर पोहोचली असून, या प्रकरणात जबाबदार १० जणांना अटक करण्यात आली आहे. याप्रकरणी कर्तव्यात कसूर केल्याच्या आरोपावरून पोलीस आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या २२ जणाचं निलंबन करण्यात आलं असून, त्यामध्ये ९ पोलीस कर्मचाऱ्यांचा आणि १३ राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

**बॅंडमिंटन**

सिंगापूर खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत, भारतीय पुरुष दुहेरीची जोडी सात्विक साईराज रांकी रेड्डी आणि चिराग शेट्टी जोडीनं स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली. जागतिक क्रमवारीत अव्वल असलेल्या दक्षिण कोरियाच्या जोडीचा त्यांनी २१-१९, २१-१८ अशा गुणांनी काल पराभव केला. उपांत्य फेरीच्या दुसऱ्या सामन्यात इंडोनेशिया आणि चीन यांच्या सामन्यातील विजेत्याशी भारतीय जोडीचा सामना होणार आहे. भारताच्या मिश्र दुहेरीच्या जोड़ीला जपानच्या जोडीकडून पराभव पत्करावा लागला.

**हिंदी पत्रकारिता**

हिंदी पत्रकारितेची २०० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त, दळणवळण मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी काल नवी दिल्ली इथं, पहिलं हिंदी वृत्तपत्र 'उदंत मार्तंड'च्या सन्मानार्थ एक विशेष टपाल तिकीट आणि प्रथम-दिन आवरण प्रकाशित केलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यानिमित्त दिलेल्या संदेशात सांगितलं की, हिंदी पत्रकारितेचा द्विशताब्दी सोहळा भारताची चेतना, विचार आणि लोकजागृतीचा उत्सव आहे.

या प्रसंगी बोलताना शिंदे म्हणाले की, पत्रकारितेचा इतिहास हाच भारताचा इतिहास आहे. पत्रकारिता हा केवळ एक व्यवसाय नाही; तर ती राष्ट्रीय जागृतीची एक चळवळ आहे. काळ बदलू शकतो, तंत्रज्ञान बदलू शकतं आणि माध्यमंदेखील बदलू शकतात; परंतु पत्रकारितेचं मूलभूत कर्तव्य मात्र कधीही बदलता कामा नये असं शिंदे यांनी आग्रहानं सांगितलं.

**केरळम**

केरळममधील १४ जिल्ह्यांपैकी सहा जिल्ह्यांमध्ये आज मुसळधार पावसाचा पिवळा बावटा जारी करण्यात आला आहे. पुढील चार दिवसांत संपूर्ण राज्यात अधूनमधून मुसळधार पाऊस आणि ताशी ४० किलोमीटर वेगापर्यंत वारे वाहण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. केरळममध्ये मान्सूनच्या आगमनाची अद्याप अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही.

**शेवटी पुन्हा ठळक बातम्या**

**-गरज भासल्यास ऑपरेशन सिंदूरच्या दुसऱ्या टप्प्यासाठी लष्कर सज्ज असल्याचं लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांचं प्रतिपादन**

**-शेतीमध्ये खतांचा अतिरेक रोखण्यासाठी उद्यापासून ३० जूनपर्यंत देशभरात 'खेत बचाओ अभियान'**

**-पश्चिम आशियातील संघर्षामुळं जागतिक अनिश्चितता असतानाही, भारताची आर्थिक कामगिरी भक्कम आणि स्थिर - वित्त मंत्रालयाचा अहवाल**

**- हिंदी पत्रकारितेची द्वीशताब्दीनिमित्त, पहिलं हिंदी वृत्तपत्र 'उदंत मार्तंड'च्या सन्मानार्थ टपाल तिकीटाचं अनावरण आणि**

**-सिंगापूर खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत, सात्विक साईराज रांकी रेड्डी आणि चिराग शेट्टी जोडी अंतिम फेरीत**

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.